प्रेसनोट पुणे दिनांक १८/०६/२०१९

# सातारा येथे पोलीस बतावणी करुन गुन्हे करणारा रेकॉर्डवरील आरोपीस युनिट – ४, गुन्हे शाखेकडुन अटक.

सातारा येथिल शाहुपुरी पोस्टे चे हदिदत वाणिज्य कॉलेज समोर सातारा येथे दि.११/०६/२०१८ रोजी एक ७५ वर्षाचे जेष्ठ नागरीक रस्त्याने चालत जात असताना दोन इसमांनी त्यांना रस्त्यात अडवुन आम्ही पोलीस आहोत पुढे चो-या होतात याकरीता तुम्ही तुमच्या हातातील सोन्याची अंगठी व गळयातील सोन्याची चैन काढुन रुमालात ठेवा असे सांगितल्याने त्यांचेवर विश्वास ठेवुन त्यांचे सांगणेप्रमाणे सदर जेष्ठ नागरीकाने त्याच्या हातातील सोन्याची अंगठी व गळयातील सोन्याची चैन काढुन रुमालात ठेवली त्या रुमालास बांधण्याचा बहाणा करुन त्यातील सोन्याची अंगठी व सोन्याची चैन हातचलाखी करुन काढुन घेवुन रुमाल त्यांच्या हातात देवुन चोरटे पसार झाले होते त्याबाबत शाहुपुरी पोस्टे सातारा येथे गुरनं ४५/२०१८ भादविक १७०,४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्हयाचे तपासकामी सातारा पोलीसांना आरोपीचे सिसिटीव्ही फुटेज मध्ये वर्णन मिळाले होते त्यवरुन तपास चालु होता. सदरचे सिसिटीव्ही फुटेज गुन्हे शाखा युनिट ४ चे कर्मचारी राजु मचे यांना प्राप्त झाले होते.

दि. ३०/०५/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट ४ चे अधिकारी व कर्मचारी यांनी मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री अशोक मोराळे सो यांनी दिलेले सुचना व आदेशावरुन पाटील इस्टेट इराणी वस्ती शिवाजीनगर येथे कोंबिंग ऑपरेशन करण्यात आले त्यावेळी रेकॉर्डवरील एकुण ४७ गुन्हेगार चेक करण्यात आले. गुन्हेगार चेकिंग दरम्यान एका गुन्हेगाराचे वर्णन पोहवा राजु मचे यांना सातारा येथुन प्राप्त झालेले सिसिटीव्ही फुटेज मधील वर्णनाचे आरोपीशी मिळतेजुळते असल्यचे लक्षात आल्याने त्याच्या बाबत गुप्त माहीती काढता त्याचे नाव शौकत खान जमान इराणी वय ४८ वर्ष रा. महात्मा गांधी वसाहत, शिवाजी नगर पुणे असे असल्याचे व तो पोलीस बतावणी करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहीती प्राप्त झाली त्यामुळे त्याचेवर लक्ष ठेवुन त्यास काल दि.१७/०६/२०१९ रोजी ताब्यात घेवुन त्याच्याकडे सातारा येथिल वर नमुद गुन्हयाबाबत चौकशी करता चौकशी अंती त्याने नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दाखल गुन्हयाच्या पुढील कारवाई करीता शाहुपुरी पोस्टे सातारा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.अशोक मोराळे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.शिरीष सरदेशपांडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे -२, श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली युनिट -४, गुन्हे शाखा,पुणे शहर कडील पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, व पोलीस कर्मचारी शंकर पाटील, राजु मचे, गणेश काळे, सचिन ढवळे, शितल शिंदे यांनी केलेली आहे.